**Annexure – VII**

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**

**BAHADUR SHAH ZAFAR MARG**

**NEW DELHI – 110 002**

**PROFORMA FOR SUBMISSION OF INFORMATION AT THE TIME OF SENDING THE FINAL REPORT OF THE WORK DONE ON THE PROJECT**

| | |
|---|---|
| 1. TITLE OF THE PROJECT | : **Sant Tukaramancha Sant vishayak Drushtikon : Ek Abhyas** |
| 2. . NAME & ADDRESS OF (THE PRINCIPAL INVESTIGATOR) | : **Dr. Ravindra Vaijnathrao Bembare Nath Nagar Degloor Dist- Nanded.** |
| 3. NAME & ADDRESS OF THE INSTITUTION | : **Vai Dhunda Maharaj Degloorkar College Degloor Dist – Nanded (Maharastra)** |
| 4. UGC APPROVAL LETTER NO. & DATE | : **No.F. 23-1579/14 General -193 (WRO) XII Plan Dated:-22.03.2017** |
| 5. DATE OF IMPLEMENTATION | : **01 April 2017.** |
| 6. TENURE OF THE PROJECT | : **02 Year (01 .04.2017 To 31.03. 2019)** |
| 7. TOTAL GRANT ALLOCATED | : **90000 /-** |
| 8. TOTAL GRANT RECEIVED | : **60000 /-** |
| 9. FINAL EXPENDITURE | : **94119 /-** |
| 10. TITLE OF THE PROJECT | : **Sant Tukaramncha Sant Vishyak Drushtikon : Ek Abhyas** |

11. OBJECTIVES OF THE PROJECT :-

**संशोधनाची उद्दिष्टये**

१. साधुसंताची रूढ संकल्पना समजून घेणे.
२. संत तुकारामपूर्व व समकालीन संतांचा संत विषयक दृष्टिकोन अभ्यासणे.
३. संत तुकारामांच्या अभगातील असंत लक्षण अभ्यासणे.
४. संत तुकारामांच्या अभंगातील संत लक्षणांचा अभ्यास करणे.
५. संत तुकारामांनी सांगितलेले संतांचे महत्त्व समजून घेणे.
६. संत तुकारामांच्या संत चिंतनाची वर्तमान युगात प्रासंगिकता तपासणे.

12. WHETHER OBJECTIVES WERE ACHIEVED : Separate sheet attach

( GIVE DETAILS )

13. ACHIEVEMENTS FROM THE PROJECT : Separate sheet attach

14. SUMMARY OF THE FINDINGS : Separate sheet attach ( IN 500 WORDS )

15. CONTRIBUTION TO THE SOCIETY : Separate sheet attach

( GIVE DETAILS )

16. WHETHER ANY PH.D. ENROLLED/PRODUCED OUT OF THE PROJECT...............

17. NO. OF PUBLICATIONS OUT OF THE PROJECT : Separate sheet attach

( PLEASE ATTACH)

**SIGNATURE OF**
**THE PRINCIPAL INVESTIGATOR**
**Dr.Ravindra Vaijnathrao Bembare**

प्रमुख, मराठी विभाग
कै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

**PRINCIPAL**
**Dr. Vijay Kulkarni**

PRINCIPAL
Vai Dhunda Maharaj Degloorkar College
DEGLOOR Dist.Nanded.

# UNIVERSITY GRANT COMMISION

## WESTERN REGIONAL OFFICE

## GANESHKHIND, PUNE-411007

**Minor Research Project**

**Project Tital : संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास**

## Project Researcher : Dr. Ravindra Vaijnathrao Bembare

12. WHETHER OBJECTIVES WERE ACHIEVED

**संशोधन उद्दिष्टांचे साफल्य :-**

१. प्रस्तुत प्रबंधात विविध मराठी व्युत्पत्ती कोश, भारतीय संस्कृती कोश, मराठी विश्वकोश, शब्दार्थ कोश, पर्याय कोश, व प्राचीन संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करून साधुसंताची रूढ संकल्पना समजून घेण्यात आली.

२. संत ज्ञानेश्वर, नामदेवापासून ते एकनाथापर्यंतच्या वारकरी संतांच्या संत चिंतनाचा अभ्यास करण्यात आला. त्याबरोबरच सुफी आणि वीरशैव परंपरेतील संतांचा संत विषयक दृष्टिकोन अभ्यासण्यात आला. संत तुकारामपूर्व व समकालीन संतांचा संत विषयक दृष्टिकोन अभ्यासण्यात आले.

३. संत तुकारामांच्या अभंगातील असंत लक्षणे विस्ताराने अभ्यासण्यात आली. तुकारामांच्या अभंगातून दांभिकाबद्दल जे चिंतन साकारले त्याचा शोध घेण्यात आला. संत तुकारामांनी दांभिक साधुंची सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने जी विघातकता स्पष्ट केली त्याचा अभ्यास केला.

४. संत तुकारामांच्या अभंगातील संत लक्षणांचा अनेक अंगाने अभ्यास करण्यात आला. संत तुकारामांनी संत विषयक जो दृष्टिकोन मांडला त्याचा विस्तृत अभ्यास करण्यात आला. यात प्रसंगी विविध संतांनी मांडलेल्या संत लक्षणांचा तौलनिक विचार करण्यात आला.

५. संत तुकारामांनी सांगितलेले संतांचे महत्त्व अभ्यासण्यात आले. मानवी जीवनातील साधुसंताचे लौकिक व पारलौकिक दृष्टिकोनातून जे महत्त्व तुकारामांनी अभंगातून प्रतिपादित केले. त्याचा अभ्यास करण्यात आला.

6. संत तुकारामांच्या संत चिंतनाची वर्तमान युगात प्रासंगिकता अभ्यासण्यात आली. एकविसाव्या शतकात जो भोंदू साधुंचा सुकाळ झाला. त्या पार्श्वभूमीवर संत तुकारामांच्या संत विषयक चिंतनाची प्रासंगिकता अभ्यासण्यात आली.

प्रमुख, मराठी विभाग

# UNIVERSITY GRANT COMMISION

## WESTERN REGIONAL OFFICE

## GANESHKHIND, PUNE-411007

**Minor Research Project**

**Project Tital : संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास**

**Project Researcher : Dr. Ravindra Vaijnathrao Bembare**

**13. ACHIEVEMENTS FROM THE PROJECT**

**शोध प्रबंधाची उपलब्धी :-**

संत तुकारामांच्या अभंगांचा विविध दृष्टिकोनातून आजपर्यत मोठयाप्रमाणात अभ्यास झाला. पण संत तुकारामांनी साधू आणि संताबद्दल आपल्या अभंगातून जो चिंतन मांडला त्याचा फारसा अभ्यास आजपर्यंत झाला नव्हता. संत तुकारामांनी संताबद्दल अत्यंत सखोल आणि मौलिक स्वरूपाचे चिंतन केले. यावर संशोधन होऊन ते समाजापर्यंत पोहचणे गरजेचे होते, पण तुकारामांचे संत चिंतन दुर्लक्षितच राहिले होते. माझ्या या शोध प्रकल्पातून तुकारामांच्या अभंगातील एका महत्त्वाच्या पैलूवर प्रकाश पडला. यात कोश वाङ्मय, संस्कृत वाङ्मय, मराठी संत वाङ्मयाचा अभ्यास केला. यामुळे एकंदर संतचिंतनाचा एकत्रित अभ्यास येथे झाला आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधातून संतकल्पना स्पष्ट केली असल्यामुळे यातून धर्मशास्त्राच्या अभ्यासात भर पडणार आहे. संत तुकारामांच्या अभंगातील संत चिंतन विषयक हे संशोधन विविध भाषेतील संत साहित्याच्या पुढील अभ्यासासाठी पूरक ठरणार आहे. संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन स्पष्ट करण्याच्या भूमिकेतून संत तुकारामांच्या तत्त्वज्ञानाचा विचार या प्रबंधात केला असल्याने हा शोधप्रबंध तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्रच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या दृष्टीने हा शोधप्रबंध जसा महत्त्वपूर्ण आहे. तसेच मानसशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, समाजकार्यशास्त्र इत्यादी ज्ञानशाखेतील पुढील अध्ययन व संशोधनासाठी पूरक ठरणारे आहे.

**डॉ. रवींद्र बेम्बरे**

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

प्रमुख, मराठी विभाग

वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

# UNIVERSITY GRANT COMMISION

## WESTERN REGIONAL OFFICE

## GANESHKHIND, PUNE-411007

**Minor Research Project**

**Project Tital : संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास**

**Project Researcher : Dr. Ravindra Vaijnathrao Bembare**

**14. SUMMARY OF THE FINDINGS**

**निष्कर्षात्मक सारांश :-**

विविध शब्दकोशातून सज्जन आणि परोपकारी माणसाला साधू संबोधले आहे. आपल्या धर्मातील तत्त्वज्ञानानुसार आचरण करून जगासमोर धर्माचा आदर्श प्रस्थापित करणारा सदाचारी व्यक्ती म्हणजे साधू असे सांगितले आहे. संत शब्दाची उत्पत्ती संस्कृतमधील सत् शब्दापासून झालेली आहे. संस्कृत भागवतात सत् हा शब्द सद्भाव, साधुभाव, प्रशस्त कर्म या अर्थाने वापरण्यात आला आहे. महाभारतात सावित्री आणि यमाच्या संवादातून मन, वाचा आणि कृतीतून कुणाचाही द्वेष न करता सर्वांवर उपकार करणाऱ्या परोपकारी व्यक्तीला संत संबोधले आहे. योगवसिष्टात लौकिक मान अपमान, सुख दुःख या गोष्टीकडे स्थिर बुद्धीने पाहणारा, लोकोद्धारार्थ झटणारा, निरपेक्षपणे मदतीचा हात देणारा व्यक्ती म्हणजे संत आणि साधू असे सांगितले आहे.

मी आणि माझे या पलीकडे जाऊन विश्वातील सर्व प्राणीमात्राबद्दल व्यापक सहानुभाव जोपासणारा, विवेकनिष्ठ व्यक्ती म्हणजे संत असे ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. ज्याला संत व्हायचे आहे, त्याने जगाचे बोलणे सहन करून जगाचे कल्याण साधले पाहिजे असे मुक्ताईंने सांगितले. सदगुणी हरिभक्त म्हणजे संत असे निवृत्तीनाथांनी सांगितले.

सर्व विकारापासून मुक्त होऊन चराचर सृष्टीशी तादात्म्य पावणे म्हणजे संतत्व अशी नामदेवांची भूमिका आहे. समाजाला सन्मार्गाला लावण्यासाठी संतांची गरज असल्याचे जनाईने प्रतिपादित केले. संतांनी येथील जडजीवाचा उद्धार केला म्हणून गोरा कुंभार संतांना ब्रह्मदेवाचा अंश संबोधतात. सावता माळी प्रतीपरमेश्वर म्हणून ते संताकडे पाहतात.

संत कळण्यासाठी आपल्या अंगी संतत्व असले पाहिजे असे चोखा मेळा सांगतात. शेख महमदांनी सदगुरूबद्दल जे चिंतन केलेले आहे त्यातून त्यांचा संत विषयक दृष्टिकोनच प्रकटला आहे. कोणत्याही परिस्थितीत ज्याचे मन शांत असते, त्याला संत एकनाथांनी संत संबोधले आहे. भक्त आणि परमेश्वर यातला एक दुवा म्हणून मन्मथ स्वामी संताकडे पाहतात.

केवळ बाह्यउपाधीने कुणीही संत होऊ शकत नाही, अशी तुकारामांची स्पष्ट भूमिका आहे. वेसनाधीन साधुंना तुकारामांनी स्पष्टपणे नाकारले. नाथ, लिंगायत, महानुभाव, वारकरी, सुफी परंपरेतील वेशधारी साधुंचाही बेगडीपणा तुकारामांनी उघडा केला. भोंदू, आळशी, स्वार्थी, कामचुकार, वासनांध दांभिकापासून समाजाला सावध करण्याचा प्रयत्न तुकारामांनी निष्ठेने केला आहे.

केवळ भक्ती, ज्ञान, कर्म आणि योग यात गुंतून पडलेली समाजविन्मुख व्यक्ती तुकारामांच्या नजरेतून साधू नाही. साधुत्वाच्या नावाखाली संसारापासून लांब पळणे, भिक्षा मागणे तुकारामांना मान्य नाही. मनात मोह ठेवून प्रवचन, कीर्तन, उपदेश करणाऱ्या लोकांचे साधुत्व तुकारामांनी स्पष्टपणे नाकारले. चमत्कार, जडीबुट्टीचें उपचार, भूतबाधा उतरवणे, मंत्र तंत्राची साधना करणे, काळी विद्या जाणणे, शकुन सांगणे अशा गोष्टी करून आपला प्रपंच चालवणाऱ्या लोकांना नाकारून साधू बाबत विवेकांने विचार करायला तुकाराम प्रवृत्त करतात.

संताकडे लौकिक संपत्ती नसली तरी क्षमा, दया, शांती, करुणा आणि सत्य अशा सदगुणांचे भांडवल असते. रंजल्या गांजलेल्यांना जो जवळ करतो तोच संत असे तुकाराम स्पष्टपणे सांगतात. आपल्या कृती आणि उक्तीतून मानवी मूल्यांचे संवर्धन करणारा व्यक्तीच तुकारामांना संत म्हणून अभिप्रेत आहे. सर्वप्रकारच्या लौकिक भेदभावाच्या पलीकडे जाऊन समत्त्वभावाने जगाकडे पाहणाऱ्या व्यक्तीमध्येच तुकाराम संत पाहतात.

ज्याचे अंत:करण पवित्र आहे त्याला माळा मुद्रांची भुषणे धारण करून देखावा करण्याची आवश्यकता नाही. तुकारामांनी संताची जी लक्षणे सांगितली ती सर्व लक्षणे अगोदर प्रयत्नपूर्वक आपल्या अगी बाणवली. विलक्षण स्थिर राहून जगाचे आघात सहन करतो तोच संत ठरतो. संताची प्रत्येक कृती आणि उक्ती जगाच्या कल्याणार्थच असल्याचे तुकाराम सांगतात.

संत महिमा जाणण्यासाठी आपल्या अंगी संतत्व असले पाहिजे. संतांचा महिमा सूर्याप्रमाणे स्वयंसिद्ध असल्यामुळे तो वेगळा सांगण्याची आवश्यकता तुकारामांना वाटत नाही. ज्याच्या वृत्तीत संतत्व आहे तोच आपल्या जातीचा असल्याचे सांगून त्याच्या भेटीची प्रतिक्षा तुकाराम करतात. अग्नीच्या संपर्कात गेलेली वस्तू अग्नीरून होते त्याच प्रमाणे संतांच्या सहवासात गेलेली व्यक्ती संतरूप होते असा तुकारामांचा विश्वास आहे.

संत आणि देव एकच असून निमित्तमात्र प्रतिमा वेगळया आहेत. जगाच्या उद्धारार्थ देव संतांच्या रूपात साकारला. संतांना टाळून देवाची पूजा करणे तुकाराम अधर्म समजतात. जिवंत संतांना अव्हेरून देवाच्या निर्जिव मूर्तीचे केलेले अभिषेक तुकारामांच्या विवेकाला पटत नाही. देवाच्या पूजेने माणूस देव होऊ शकत नाही; पण संत पूजेने माणूस संतपदी पोहचतो. म्हणून तुकारामांना संत महत्त्वाचे वाटतात. संताप्रमाणे शुद्ध आचरण हीच संताची पूजा असल्याचा जो दृष्टिकोन मांडला तो विलक्षण विवेकनिष्ठ आहे.

संताचे दर्शन टाळणाऱ्या व्यक्तींना तुकाराम अभागी समजतात. संतांच्या गुणदोषाची चिकित्सा करणे म्हणजे फुल पिळून त्यातला गंध शोधल्याप्रमाणे आहे असे तुकाराम सांगतात. तुकारामांचा हा विचार काहीसा एकांगी वाटतो. संतत्त्वाचा बुरखा पांघरून वासना विकारांची पूर्ती करणाऱ्या दांभिकांची चिकित्सा झालीच पाहिजे. संत तुकारामांनी वेशधारी दांभिकाबद्दल सतराव्या शतकात जी निरीक्षणे नोंदवली तेच वास्तव चारशे वर्षांनी आज समाजात आढळते. वर्तमान पार्श्वभूमीवर तुकारामांचा संतविचार पदोपदी प्रासंगिक ठरतो. संतत्त्वाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या विश्वातील तमाम साधकासाठी तुकारामांचे जीवन आणि काव्य दीपस्तंभा प्रमाणे कायम आदर्श ठरते.

डॉ. रवींद्र बेम्बरे
प्रमुख, मराठी विभाग,
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

प्रमुख, मराठी विभाग
वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

# UNIVERSITY GRANT COMMISION

## WESTERN REGIONAL OFFICE

## GANESHKHIND, PUNE-411007

**Minor Research Project**

## *लघुशोध प्रकल्पकार्याचे सामाजिक उपयोगिता*

**Project Tital : संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास**

## Project Researcher : Dr. Ravindra Vaijnathrao Bembare

15. CONTRIBUTION TO THE SOCIETY

**संशोधनाचे सामाजिक योगदान :-**

या शोधप्रबंधातून संत संकल्पना स्पष्ट होणार असून साधू आणि भोंदू कसा ओळखावा ? या गोष्टींचा उलगडा होऊन समाजाला साधुसंतांकडे पाहण्याची एक विवेकी दृष्टी प्राप्त होईल. भोंदू साधुंच्या भुलथापा, शकुन कथन, चमत्कार, अंगारा धुपारा, भूत उतरवणे अशा गोष्टीना समाज बळी पडणार नाही. दांभिक साधुंच्या लक्षणाचा विस्ताराने विचार या प्रबंधात केला असल्यामुळे दांभिक भोंदू वेळीच कळायला मदत होईल. यामुळे भाबडेपणाने समाज कोणाही दांभिकाच्या अहारी जावून त्यांच्या वासनेचा शिकार होणार नाही. बलात्कारासारख्या गुन्ह्यामुळे कारागृहात गेलेल्या बुवा बाबासाठी आंधळेपणाने समाज रस्त्यावर उतरणार नाही. समाजात भोंदुबाबांचे स्तोम कमी व्हायला निश्चितच मदत होईल.

कोणताही देखावा न करता मानवी मूल्याच्या प्रतिष्ठापनेसाठी किंवा जगाच्या कल्याणार्थ व्रतस्थपणे झिजणारे जे साधुसंत आहेत, त्यांची कदर करण्याची दृष्टी या प्रबंधातून मिळेल. खऱ्या संतांची पारख करण्याच्या दृष्टीने सदरील संशोधन उपयुक्त ठरणारे असल्यामुळे सदाचारी नीतिमान लोकांना सन्मान मिळेल. मूल्याधिष्ठीत जीवनाचा आदर्श प्रस्थापित करणाऱ्या संताच्या हृदयातच परमेश्वराचे वास्तव्य असते. तोच खरा साधू असतो. हा या प्रबंधातला विचार समाजाच्या गळी उतरला तर तीर्थयात्रा करीत वेळ, पैसा आणि उर्जेचा अपव्यय न करता संतांच्या संगतीत राहून त्यांचे सदगुण आत्मसात करण्याकडे समाजाचा कल वाढेल. माणसातला देव पाहून मानवतेच्या उन्नयनाचा विचार स्वीकारला जाईल. त्यातून मानवी जीवन सर्वार्थाने उन्नत होईल.

**डॉ. रवींद्र बेम्बरे**
प्रमुख, मराठी विभाग,
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

प्रमुख, मराठी विभाग
वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर

# UNIVERSITY GRANT COMMISION

## WESTERN REGIONAL OFFICE

## GANESHKHIND, PUNE-411007

**Minor Research Project**

**Project Tital : संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास**

## Project Researcher : Dr. Ravindra Vaijnathrao Bembare

**17. NO. OF PUBLICATIONS OUT OF THE PROJECT :**

| Title<br>with page Nos. | Journal / Books | Mounth & Year | ISSN /<br>ISBN No.<br>Impact<br>Factor | Whether international / National/ State level |
|---|---|---|---|---|
| एकविसाव्या शतकात संत तुकारामांच्या अभंगाची प्रासंगिकता | एकविसाव्या शतकातील साहित्य या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर. | दि.१० व ११ एप्रिल २०१७ | Isbn—978-93-5240-095- | National Publisher |
| संत तुकारामांचा सर्वाभुती समत्त्वभाव | लातूर हिंदी साहित्य परिषद व स्वा.रा.ती.म.वि. नांदेड संपादित ग्रंथ | दि. १२ नोव्हेंबर २०१७ | **ISBN No.** ९७८-९३-५२४०-१४६-८ | National Publisher |
| संत तुकारामांचे चिरंतन जीवन चिंतन | Contemporary Research in India माऊली महाविद्यालय वडाळा | दि.०३ मार्च २०१८ | **ISSN** २२३१-२१३७ Impact Factor २०१८ : ३.२३ | Inter-national Journal |
| संत तुकारामांच्या अभंगातील स्त्री विषयक संवेदना | Ajanta, Research Journal<br>शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद | दि. १७ मार्च २०१८ | **ISSN** २३४८-७१४३ Impact Factor ३.४५२ | Inter-national Journal |
| संत तुकारामांच्या दृष्टिकोनातील संत | Research Journey E-Research Journal | Feb-2019 | **ISSN** २३४८-७१४३<br>Impact Factor Sjif-६.२६१ | Inter-national Journal |
| संत संकल्पनेचा मागोवा | Research Journey E-Research Journal | March 2019 | **ISSN** २३४८-७१<br>Impact Factor Sjif-६.२६१४३ | Inter-national Journal |

प्रमुख, मराठी विभाग

## UNIVERSITY GRANT COMMISION
### WESTERN REGIONAL OFFICE

### GANESHKHIND, PUNE-411007

**Minor Research Project**

**FINAL REPORT OF THE WORK DONE ON THE PROJECT**

# *लघुशोध प्रकल्पकार्याचा अंतीम अहवाल*

**Project Tital : संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास**

**Project Researcher : Dr. Ravindra Vaijnathrao Bembare**

**प्रस्तावना :-**

भारतभूमी ही जगाला लौकिक व पारलौकिक उन्नतीची दिशा देणाऱ्या संत महंतांची भूमी आहे. मानव जातीच्या नैतिक उन्नतीत भारतातील साधुसंताचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. आपल्या कृती आणि उक्तीतून जगाला लौकिक आणि पारलौकिक उन्नतीची दिशा दाखवण्याचे काम संतांनी केले. धर्म आणि नीतीच्या प्रतिष्ठापनेसाठी लक्षावधी ज्ञात आणि अज्ञात संतानी आपले संपूर्ण जीवन अर्पित केले. आदिम काळापासून ते आजपर्यंत मानवजातीच्या उन्नतीत संतांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. प्रत्येक संतांनी आपल्या कृती उक्तीतून धर्माचा आदर्श जगासमोर ठेवून आत्मिक उन्नतीचा सोपा मार्ग दाखवला. 'आम्हा हे कौतुक | जगा द्यावी नीत || ' या उक्तीप्रमाणे नीतिमूल्यांच्या संवर्धनासाठी संतानी आपले जीवन वाहिले. जगातील इतर राष्ट्राच्या तुलनेत भारत देशाला साधुसंतांची एक समृद्ध परंपरा लाभल्याचे पहायला मिळते. भारतीय विचारपरंपरा सर्वांगाने समृद्ध करण्याचा प्रयत्न येथील संतांनी केला आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर तेराव्या शतकापासून ते विसाव्या शतकापर्यंत संतांची एक अखंडित परंपरा येथे पहायला मिळते. सर्वप्रकारची विषमता आणि असहिष्णतेला मुठमाती देऊन समन्वयाचा विचार रूजवण्याच्या भूमिकेतून तेराव्या शतकात वारकरी संप्रदाय येथे

अस्तित्वात आला. तुकारामांनी आपल्या जीवनातून संतत्त्वाचा एक उत्तुंग आदर्श जसा प्रस्थापित केला तसेच त्यांच्या अभंगातूनही संतत्वाबद्दल सखोल असे चिंतन साकारले आहे.

साधुसंताद्दल आजपर्यंत स्वतंत्रपणे अभ्यास झाला नाही. लोकांच्या मनात संताबद्दल आदरभाव असला तरी संत कुणाला म्हणावे ? याबद्दल मात्र प्रचंड संभ्रम आहे. 'खरे साधुसंत पडले सांधीत | लबाडाने मत्त माजविले'या उक्तीप्रमाण आज खऱ्या संतापेक्षा दांभिकांचाच बोलबाला वाढला आहे. अशा वेशधारी दांभिकाकडून भाबडया भक्तांचे शोषण होते. अनेक वेळा हे दांभिक कोवळया वयातील मूलींना आपल्या वासनेचे शिकार बनवतात. अशा घटनेमुळे लोकांचा साधुसंतावरचा विश्वासच उडत आहे. आज समाजातला एक वर्ग प्रत्येक साधुकडे संशयाने पाहून तिरस्कार करीत आहे तर दुसरा वर्ग बलात्काराच्या गुन्हयामुळे शिक्षा झाल्यानंतर बाबाला वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरून प्राण द्यायला तयार होत आहे. या पार्श्वभूमीवर नेमके संत म्हणजे कोण? संतांची भूमिका काय? संत कसा ओळखावा? संतांचे महत्त्व काय ? अशी अनेक प्रश्न सर्वसामान्य माणसाला पडत आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधणे आज नितांत गरजेचे वाटले. म्हणून या पार्श्वभूमीवर संत संकल्पना, संत लक्षणे आणि संतांचे महत्त्व या दृष्टीने संत तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करण्याच्या भूमिकेतून **संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास** या विषयावर लघु संशोधन प्रकल्प केले.

या विषयावर संशोधन प्रकल्प करीत असतांना पुढील उद्दिष्टास अनुसरून हे संशोधन करण्यात आले. १. साधुसंताची रूढ संकल्पना समजून घेणे. २ संत तुकारामपूर्व व समकालीन संतांचा संत विषयक दृष्टिकोन अभ्यासणे. ३ संत तुकारामांच्या अभंगातील असंत लक्षण अभ्यासणे. ४ संत तुकारामांच्या अभंगातील संत लक्षणांचा अभ्यास करणे. ५ संत तुकारामांनी सांगितलेले संतांचे महत्त्व समजून घेणे. ६ संत तुकारामांच्या संत चिंतनाची वर्तमान युगात प्रासंगिकता तपासणे. ही सर्व उद्दिष्टे प्रस्तुत प्रकल्पकार्यात साध्य झालेली आहेत.

प्रस्तुत लघु संशोधन प्रकल्पासाठी आधारभूत माहिती मिळवण्यासाठी विविध भाष्यग्रंथ, संत गाथा आणि त्यावर आधारित संशोधनपर संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध, कोशवाङ्मय, नियतकालिके यांचा यथोचित वापर करण्यात आला. तुकाराम व तुकारामपूर्व संताचे संत

विषयक दृष्टिकोन अभ्यासण्याच्या भूमिकेतून आळंदी व देहू सारख्या क्षेत्रांना भेटी देऊन या संदर्भात तथ्याचे संकलन करण्यात आले. त्याबरोबरच समाजातील संत विषयक धारणा समजून घेण्यासाठी काही धार्मिक स्थळांना भेटी देऊन वर्तमान परिस्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन करण्यात आले. विविध ग्रंथालयांना भेटी देण्यात आल्या. अशा प्रकारे निरनिराळया पद्धतीने माहितीचे संकलन करून योग्य तेथे विश्लेषनात्मक आणि प्रसंगी तुलनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून प्रस्तुत संशोधन करण्यात आले.

प्रस्तुत संशोधन प्रकल्पकार्याची सुरुवात ०१ एप्रिल २०१७ पासून करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठवलेल्या संशोधन अराखडयाला अनुसरून प्रस्तुत संशोधन करण्यात आले. संशोधनामागच्या भूमिकेला अनुसरून संशोधनाची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात आली. यानंतर **संत शब्द व संकल्पनेचा अर्थ** या प्रकरणाचा अभ्यास करण्यात आला. प्रकरणात मराठी व्युत्पत्ती कोश, भारतीय संस्कृती कोश, मराठी विश्वकोश, विविध शब्दकोश आणि पर्याय कोश यात संत शब्दाचा जो अर्थ सांगितला त्याचा विवेचक अभ्यास केला. त्यानंतर श्रीमद्‌भगवदगीता, महाभारत, योगवसिष्ट, अमरकोश, नीतिशतक या संस्कृत ग्रंथात संत शब्दाची उत्पत्ती आणि संत शब्दाबद्दल विविध ठिकाणी जे संदर्भ सापडतात. त्याचा परामर्श घेऊन प्रस्तुत प्रकरणात संत संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे.

तुकारामपूर्व व समकालीन संतांचा संत विषयक दृष्टिकोन समजून घेण्याच्या भूमिकेतून **संत तुकारामपूर्व आणि समकालीन संतांचा संत विचार** या प्रकरणाची मांडणी करण्यात आली. यात वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, नामदेव, निवृत्तीनाथ, मुक्ताबाई, जनाबाई, गोरा कुंभार, सावता माळी, सेना न्हावी, चोखा मेळा, कर्म मेळा, नरहरी सोनार, संत एकनाथ यांच्या साहित्यातून विशेषतः अभंगातून साकारलेल्या संत चिंतनाचा मागोवा घेण्यात आला. सुफी संप्रदायातील शेख महमदांच्या अभंगातील संत विषयक दृष्टिकोनाचा विचार करण्यात आला. मराठी वीरशैव संत परंपरेतील तुकाराम पूर्व संत मन्मथ स्वामी यांच्या अभंगातील संत विषयक विचाराचा परामर्श घेतला. या प्रकरणातून तुकारामपूर्व संत चिंतनाचा विस्ताराने अभ्यास करण्यात आला.

संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन यथार्थ स्वरूपात अभ्यासण्याच्या भूमिकेतून ज्यांचे संतत्त्व त्यांनी नाकारले त्याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने **संत तुकारामांच्या दृष्टिकोनातील असंत** या प्रकरणाची मांडणी करण्यात आली. कोणकोणते देखावे करून माणूस संत होऊ शकत नाही याबद्दल तुकारामांनी जे चिंतन केले त्याचा विचार या प्रकरणात केला. व्यसनाधीन साधुबद्दल तुकारामांनी केलेल्या चिंतनाचा अभ्यास केला. विकाराधीन साधुंचे तुकारामांनी जे स्वरूप स्पष्ट केले. त्यावर या प्रकरणात प्रकाश टाकण्यात आला. वेशधारी साधुंचे वर्णन करतांना वीरशैव, नाथ, महानुभाव, सुफी, वारकरी साधुंच्याबद्दल तुकारामांनी केलेल्या चिंतनाचा येथे अढावा घेण्यात आला. भुते अंगात आणणे, शकुन सांगणे, कीर्तन, प्रवचन आणि उपदेशातून धन कमावणे, देवाच्या नावावर भिक्षा मागणे असे उद्योग करणाऱ्या भोंदूविषयी तुकारामांनी जे चिंतन केले, त्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन समजून घेण्याच्या भूमिकेतून **संत तुकारामांच्या दृष्टिकोनातील संत** या प्रकरणाची मांडणी करण्यात आली. संतांच्या या जगातील भूमिकेबद्दल तुकारामांनी जो दृष्टिकोन मांडला, त्याचा अभ्यास येथे केला. साधू कोणाला म्हणावे ? हे विशद करतांना तुकारामांनी जी साधुंची लक्षणे सांगितली त्याचा विचार येथे केला. साधुसंतांचा सर्वाभुती समत्वभाव, अंतःकरणाची निर्मळता, जगाबद्दलचा कळवळा, परोपकारीवृत्ती, भुतमात्राबद्दल करुणाभाव, निःस्पृहवृत्ती, जगाचे अपराध पोटात घेण्याचे औदार्य, साधेपणा, तत्त्वनिष्ठा, कृती उक्तीतील सुसंगती इत्यादी सदगुणाबद्दल तुकारामांनी जे चिंतन केले. त्याचा विस्ताराने विचार प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे. या प्रकरणात तुकारामांना अभिप्रेत असलेला संत नेमका कसा आहे? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. योग्य तेथे इतर संतांच्या संतविषयक दृष्टिकोनाचाही तौलनिक अभ्यास करण्यात आला.

संत तुकारामांनी संतांचे जे महात्म्य प्रतिपादित केले त्याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने **संत तुकारामांच्या दृष्टिकोनातील संत महात्म्य** या प्रकरणाची मांडणी करण्यात आली. तुकारामांनी साधुसंतांची जी मौलिकता स्पष्ट केली त्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे. संतांच्या संगतीचे लौकिक आणि पारलौकिक दृष्टिकोनातून जे महत्त्व तुकारामांनी आपल्या

अभंगातून स्पष्ट केले, त्याचा विचार येथे करण्यात आला. संत आणि देव यांची तुलना करून तुकारामांनी संताचे महत्व सांगितले. संतांना अव्हेरून देवाच्या मूर्तीची पूजा करणे अधर्म असल्याची जी भूमिका तुकारामांनी घेतली. त्याचा विवेचक अभ्यास येथे केला. संत संगती टाळणे, संतांचे निंदा करणे, संतांचा अपमान करणे हे घातक असल्याचे तुकारामांनी जे चिंतन मांडले त्याचा विचार प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला. **संत तुकारामांच्या संत चिंतनाची प्रसंगिकता** या प्रकरणात वर्तमान पार्श्वभूमीवर तुकारामांच्या संत विषयक विचारांची प्रासंगिकता तपासण्यात आली. अनेक दांभिक साधुत्वाचा मुखवटा धारण करून समाजाचे शोषण करीत आहेत. काही साधू बलात्काराच्या गुन्ह्यामुळे कारागृहात जात आहेत. या परिस्थितीत तुकारामांच्या संत विषयक चिंतनाचे महत्त्व या प्रकरणातून अभ्यासण्यात आले.

एकूण सहा प्रकरणातून जे निष्कर्ष हाती आले आहेत त्याचा विचार **निष्कर्षात्मक समारोप** या प्रकरणात करण्यात आला आहे. या प्रकरणात प्रस्तुत शोध प्रबंधातून हाती आलेल्या निष्कर्षाचा एकत्रित विचार करून संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन स्पष्ट करण्यात आला आहे. या लघुशोध प्रबंधाचा अभ्यास ३१ डिसेंबर २०१९ रोजी पूर्ण झालेला आहे. या कालावधीत प्रस्तुत संशोधनाशी निगडित सहा लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. चार लेख विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा मान्यताप्राप्त नियतकालिकातून प्रकाशित करण्यात आले आहेत. या विषयाशी निगडित चार शोधनिबंध राष्ट्रीय चर्चासत्रातून सादर करण्यात आली आहेत. अशा प्रकारे या प्रकल्पातून माझ्या संत साहित्य विषयक अभ्यासात मौलिक भर पडली असून माझ्या पुढील वाटचालीसाठी अभ्यास पूरक आणि पोषक ठरणार आहे. या शोधप्रबंधातून समाजाला साधुसंताकडे पाहण्याची एक विवेकी दृष्टी निश्चितच मिळेल, असा विश्वास आहे.

**डॉ. रवींद्र बेम्बरे**

प्रमुख, मराठी विभाग,

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

प्रमुख, मराठी विभाग

वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

मुक्ताई प्रतिष्ठा,देगलूर
# वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर
NAAC Accredited B Grade (2.36 CGPA)
उपजिल्हा रूग्णालय,देगलूर च्या समोर,जि.ांदेड. 431717
E-mail : vdmdc.degloor@gmail.com

जा.क्र. वै.धुं.म.दे.म.दे/2019-20 / दि. 01-04-2019.

# PROJECT COMPLETION REPORT (PCR)

Certified that the Minor Research Project entitled "Sant Tukaramancha Sant Vishyak Drushtikon : Ek Abhyas" awarded to Principal Investigator Dr. Ravindra Vaijnathrao Bembare of Vai. Dhunda Maharaj Degloorkar College Degloor in the subject of Marathi has been successfully completed and all completion documents have been submitted to UGC – WRO, Pune.

Principal

PRINCIPAL
Vai Dhunda Maharaj Degloorkar College
DEGLOOR Dist.Nanded.